**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक १४ जुलै**

**फौजदार चावडी पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४६१/२०१७ भादंविसक ४२०,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १२/०७/२०१७ रोजी १९.४५ वा ते २१.०० वा चे दरम्यान, केशव गिप्ट सेंटर, लकी चौक्,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी ०२.५९ वाजता |
| **फिर्यादी** | : | अजय दिपचंद रावलाणी,वय ३८,रा. गुरुनानक नगर, ब्लॉक नं. ३७,मिल्ट्री कॅन्टीन सोलापूर. |
| **आरोपीचे नांव** | : | तीन अनोळखी इसम, |
| **गेला माल** | : | ८०,२००/-रु. रोख रक्क्म ,मोबाइल्स् व महत्वाची कादपत्रे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांच्या मुलीचा वाढ दिवस असल्याने,नमुद ठिकाणी गिप्ट घेवुन घरी परत जाण्या करिता कार मध्ये बसुन जात असताना नमुद आरोपीतांनी फिर्यादीचे लक्ष विचलीत करून फिर्यादीची बॅग घेवुन पळुन गेले तसेच मंगला खुशालचंद भंडारी यांचे ही लक्ष विचलीत करून नमुद अरोपीतांनी त्यांची ही बॅग पळवुन नेली.म्हणुन. तपास:- सपोनि/पांढरे. |

**एमआयडीसी पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४३०/२०१७ भादंविसक २९४,३२३,५०४,५०६,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १२/०७/२०१७ रोजी ११.०० वा चे दरम्यान, प्लॉट नं.५२/ब,कल्लप्पा म्हेत्रे वस्ती,प्लॉट नं.१ ते ५ व १०,११,या मोकळया जागेत.सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी १२.०१ वाजता |
| **फिर्यादी** | : | रेवणसिध्द मल्लिकार्जुन कुंभार वय ५०,रा. प्लॉट नं.४३/४४ कल्लप्पा म्हेत्रे वस्ती,कुमठा नाका,सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | नागेश शिवलिंगप्पा कोरे,रा. सदर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मावस भाऊ नमुद आरोपी यांने फिर्यादीचे नावे असलेला प्लॉट नं.५२/अ,कल्लप्पा म्हेत्रे वस्ती येथे येवुन फिर्यादीचे पत्र्याचे शेडवर सौ.पी.एन.कोरे सदर प्लॉट यांचे मालकीचे व कब्जे वहिवाटीचा आहे या जागेवर बेकायदेशिर अतीक्रमण केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे पेंट ने लिहुन फिर्यादी व फिर्यादीची आई सुगलाबाई व मावशी शांताबाई असे नमुद प्लॉट चे मोकळया जागेत थांबलो असता नमुद नमुद आरोपी हा |

| | | |
|---|---|---|
| | | सदर जागेवर दोरीने मोजमाप करून ही जागा माझी आहे,या जागेचे माझ्याकडे कागदपत्रे आहेत.असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून अंगावर मारण्यास येवु लागला त्यावेळी फिर्यादीची आई व मावशी हे समजावण्या करिता आले असता त्यांनाही धक्काबुक्की करून सप्टेंबर महिन्या पर्यंत फिर्यादीस खलास करतो. अशी धमकी व दमदाटी केली म्हणुन.तपासः-सफौ./पवार |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४३२/२०१७ भादंविसक ४५४,४५७,३८०,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १०/०७/२०१७ रोजी ११.२५ वा चे सुमारास ११/०७/२०१७ चे १९.०० ते १३/०७/२०१७ चे ०९.१५ वा चे दरम्यान,प्लॉट नं.५२,मिनाक्षी नगर,अक्कलकोट रोड,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी १४.३७ वाजता |
| **फिर्यादी** | : | रणजित शामसुंदर राठी,वय ४३,रा. ३८८,प.मंगळवार पेठ,सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १२,०००/-रु.मनगटी घडयाळ,एप्ली मशीन,सोनी कंपनीचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे टॉवेल कारखान्याचे ऑफीसचे दरवाज्याचे कडी कोंयंडा उचकटुन आतील लाकडी टेबलाचे ड्रॉवर मधील वरील ऐवज चोरून नेला.म्हणुन.तपासः-पोह/११५८/कांबळे. |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ३४९/२०१७ भादंविसक ४५२,३२४,३२३,५०४,५०६,३४,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १३/०७/२०१७ रोजी १६.३० वाचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरा समोर,घर नं.१८,रा-राजेश्वरी नगर,हैद्रबाद रोड,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी २२.५४ वाजता |
| **फिर्यादी** | : | दुर्गेश श्रीनिवास ईपत्ती,वय १८,रा. सदर. |
| **आरोपीचे नांव** | : | १) काशिनाथ दुर्गय्या आलम, २. अशोक दुर्गय्या आलम, ३.सिध्दु दुर्गय्या आलम, ४.हुसेन काशिनाथ आलम, सर्व रा-राजेश्वरी नगर,हैद्रबाद रोड,सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी हे फिर्यादीचे घरा समोर येवुन काशिनाथ यांचे भावाचे मुलीस कोणीतरी प्रेमपत्र दिलेले आहे ते पत्र फिर्यदीनेच दिले असे वाटुन घेवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन हाताने लाथाबुक्यांने मारहाण केल्याने फिर्यादी हा घरात गेला असता फिर्यादीचे घरात घुसुन आरोपी क्रं.२,यांने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने डोक्यात व त्याचे सोबत असलेल्या साथीदाराने लाकडी काठीने पाठीत हातास व पायास मारहाण केली तसेच भांडण सोडवविण्याकरिता फिर्यादीचे आई वडील आले असता त्यांनादेखील शिवीगाळ करुन |

| | | |
|---|---|---|
| | | मारहाण केली म्हणून पोना/५०९ जाधव |

**जोडभावी पेठ पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ३५०/२०१७ भादंविसक ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १३/०७/२०१७ रोजी १७.०० वाजता राजराजेश्वरी शाळेजवळ शेळगी सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी २३.३९ वाजता |
| **फिर्यादी** | : | हुसेन काशीनाथ अल्लम वय-२६ रा. प्लॉट नं १७ राजराजेश्वरी शाळेजवळ शेळगी सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | श्रीनिवास तुळजाराम ईपती, २) मुन्ना श्रीनिवास ईपती |
| **हकिकत** | : | यात नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपीनीं जात पंचायतमध्ये आमचे काकाचे मुलींना चिडवत असलेबाबत का सांगितले याचा राग मनात धरुन फिर्यादीस हाताने लाथाबुक्याने व चाकुने फिर्यादीचे डाव्या हातावर मधल्या बोटावर मारुन जखमी केले .तपास पोना/२०८ राठोड |

**सदर बझार पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४४४/२०१७ भादंविसक ४९८ अ, ३०४ ब, ३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २६/०५/२०१७ ते दि. ३०/५/२०१७ रोजीचे १९.३० कुरेशी नगर कुर्ला ईस्ट मुंबई |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी १७.२६ वाजता |
| **फिर्यादी** | : | अब्दुलगनी फकरुद्दीन तांबोळी वय- ६८ , रा. मौलाली गल्ली कारंजा चौक अक्कलकोट जि. सोलापूर , हल्ली सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | १) अलम नुरमहमंद सौदागर, २) सासरा- ३) सासू ४) दीर ५) जाऊ ६) चुलत सासरे व त्यांचे पत्नी रा. मुंबई |
| **हकिकत** | : | यात नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची मुलगी नामे आयेशा अलीम सौदागर वय- २१ रा. कुरेशीन नगर ईस्ट मुंबई हिस नमुद आरोपीतांनी मिळून मुलीच्या लग्नामध्ये ५१,०००/- रु हुंडा व मानपान केला नाही या कारणावरुन तिस मानसिक व शारीरीक त्रास देवून तिस जेवणातून किंवा ज्यूसमधून अतिप्रमाणात झोपेच्या गोळया दिल्याने तिचेवर उपचार चालू असतांना ती मयत झाली आहे. ॅम्हणून तपास पोनि चुनाभट्टी कुर्ला इस्ट मुंबई यांचेकडे वर्ग |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४२४ /२०१७ भादंविसक ३२४, ५०४, प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १३/०७/२०१७ रोजी ०१.३१ वाजता फिर्यादीचे घरासमोर घर नं ५६ भिमाआईनगर शाबादी पिठाचे गिरणीसमोर सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १३/०७/२०१७ रोजी ०८.४४ वाजता |
| **फिर्यादी** | : | सरुबाई राजू सानेकांबळे वय- ३० , रा घर नं ५६ भिमाआईनगर शाबादी पिठाचे गिरणीसमोर सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | राजू लक्ष्मण सोनकांबळे, रा. सदर |
| **हकिकत** | : | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही मुलेबाळ व सासू यांचेसह झोपली असता फिर्यादीचा नवरा नमुद आरोपी हा दारु पिऊन घरी ऐवून फिर्यादीस दारु पिण्यास पैसे दे म्हणून शिवीगाळ करु लागला त्यावेळी फिर्यादीने माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणाल्यावर नमुद आरोपीने चिडून जाऊन शिवीगाळ करुन ब्लेडने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारुन जखम करुन दुखपत केली. म्हणून पोना/८७ कांबळे |

**सोलापूर पोलीस आयुक्तालय शहर करिता.**